# स्टँड अप कॉमेडी शोची लहान शहरांना प्रतीक्षाच





## नकलांचेच आधुनिक रूप

मराठीत स्टँड अप कॉमेडी शोज सुरू होऊन बरीच वर्षे झाली असली, तरी मात्र मुंबई-पुण्याच्या तुलनेत लहान शहरांत अद्याप ते पोहोचू शकलेले नाही. सुरुवातीच्या काळात या विनोदी कार्यक्रमाला नकलाकारांनी एक मोठी ख्याती मिळवून दिली होती. कालांतराने मनोरंजनाचा तोच प्रकार स्टँड अप कॉमेडीच्या रूपात प्रेक्षकांसमोर आला. हिंदी-इंग्लिशकडून आलेली ही लाट मराठीत रुळली आणि स्थिरावलीही. नवीन गोष्टींचं सुरुवातीला कौतुक असतंच. तसंच या शोचंही झालं. हिंदीतही अशा शोचं थाटामाटात स्वागत झालं होतं. इंडियाज् लाफ्टर चॅलेंज या शोनं प्रेक्षकांना वेड लावलं. कार्यक्रम लोकप्रिय झाल्यामुळे त्याची एकामागे एक अशी पर्वेही येऊ लागली. विशिष्ट एका टप्प्यानंतर या विनोदी बाजाच्या कार्यक्रमांमध्ये बदल झाला. कॉमेडी सर्कस हा शो या बदलाचा पहिला प्रयोग.

## हास्यसम्राटला तुफान प्रतिसाद

दुसरीकडे मराठीत हास्यसम्राट हा स्टँड अप कॉमेडी शो सुरू झाला. त्यालाही तुफान प्रतिसाद मिळाला. त्याचीही पुढे काही पर्वे झाली. ही लाट पसरत चालली होती. हिंदीतल्या अशा कार्यक्रमांचा मराठी प्रेक्षक मराठीतल्या तशाच कार्यक्रमांमुळे मराठीकडे वळला. हे यश पाहता, वेगवेगळ्या चॅनलवर असे शो दिसू लागले. विशेष म्हणजे, त्यांची लोकप्रियता भरपूर होती. फू बाई फू, कॉमेडी एक्स्प्रेस, ढिंका चिका, ढाबळ एक तास टाइमपास असे एकेक कार्यक्रम येऊ लागले. अनेक कलावंत स्टेजवरही असे शो करू लागले. परंतु, त्यांचे कार्यक्रम केवळ मेट्रो सीटीपुरतेच मर्यादित झाले आहेत. लहान शहरांत एक तर अशा शोसाठी कलाकार येत नाहीत आणि आलेच, तर त्यांना हवा तसा प्रतिसाद प्रेक्षकांकडून मिळत नाही.



## चुकीची समजूत

एकपात्री कार्यक्रम पुण्या-मुंबईबाहेर होत नाहीत, ही चुकीची समजूत आहे. उलट, बिग बजेटचे कार्यक्रम नसतानाही धुळे-परभणीसारख्या भागातही एकपात्री कलाकार आपले प्रयोग सादर करतात. ग्रामीण भागात मूलभूत सुविधांचा अभाव असतो. खूप अडचणीही येतात, तरीही आम्ही कार्यक्रम करतो.

**-चैताली माजगावकर**, एकपात्री कलाकार



## कलाकारांची संख्या कमी

स्टँड अप कॉमेडीचे शो संपूर्ण महाराष्ट्रात फेमस होत असले, तरी एकपात्री प्रयोगांवर बंधने आहेत. कारण, यामध्ये सादरकर्त्याला स्वतःलाच त्याचे स्क्रिप्ट लिहावे लागते आणि ऐन वेळी चेंजेस करणे भाग असते. त्याचबरोबर प्रेक्षकांशी संवाद साधत प्रयोग सादर करावा लागतो; त्यामुळे याची गरज वाढली असली, तरी प्रयोग करणारे कलाकार कमी आहेत. **-मकरंद टिल्लू**, एकपात्री कलाकार



## पब्लिसिटी होणे गरजेचे

स्टँड अप कॉमेडीच्या अनेक कार्यक्रमांना चांगला प्रतिसाद मिळत असला, तरी ते पुण्या-मुंबईपुरतेच मर्यादित राहिले आहेत, असे काही नाही. जे कार्यक्रम पोहोचू शकत नाहीत, त्यामागे प्रसिद्धीचा अभाव हे प्रमुख कारण आहे. पुण्याबाहेर कार्यक्रम व्हायचे असतील, तर उत्तम पब्लिसिटी होणे गरजेचे आहे. ते होत नसल्यामुळेच शहरांपुरतेच कार्यक्रम मर्यादित राहिले आहेत.

**-दीपक रेगे**, रंगकर्मी



## इतर शहरांत प्रयोग व्हावेत

नाट्य परिषदेने जास्तीत जास्त एकांकिका राबविणे गरजेचे आहे. तसेच, या एकांकिका करताना कोणताही प्रांतवाद न करता इतरही शहरांत त्याचे प्रयोग केले पाहिजेत. रंगभूमीला चांगले दिवस आणण्यासाठी जास्तीत जास्त एकांकिका समोर आणल्या पाहिजेत. यामुळे तरुणांना नवीन व्यासपीठ व संधी मिळेल व एकांकिकांच्या माध्यमातून चांगले लिखाण समाजात उतरेल.

**-स्नेहल पुरंदरे**



## इतर शहरांत प्रयोग व्हावेत

हास्यविनोदाचे कार्यक्रम पाहणाऱ्या प्रेक्षकांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. पण, असे कार्यक्रम फक्त पुणे-मुंबई शहरांपुरते मर्यादित न राहता महाराष्ट्रातील छोट्या शहरांमध्येही सुरू झाले पाहिजेत. विनोदाचे किती तरी प्रकार आहेत आणि खेडेगावांमध्येच खरा भारत राहतो. केवळ शहरांपुरते मर्यादित न राहता. छोटी शहरे व गावांमध्येही अनेक विनोदी प्रकार घडत असतात. तेसुद्धा प्रेक्षकांच्या समोर आणले पाहिजेत. **- स्टेफी थेवर**



## कॉमेडीने ताणतणाव दूर

संध्याकाळी कामाहून घरी आल्यावर विनोदी कार्यक्रम पाहिल्याने रिफ्रेश व्हायला होते. त्याशिवाय डेली सोपमधील तेच-तेच कंटाळवाणे विषय पाहण्यापेक्षा हे जास्त चांगले वाटते. तसेच, तात्पुरत्या क्षणाची कॉमेडी असल्याने डोक्याला जास्त ताण द्यावा लागत नाही. पण, हे कार्यक्रम आज शहरांपुरतेच मर्यादित आहेत. त्याऐवजी त्याला जास्तीत जास्त प्रसिद्धी देऊन पुण्या-मुंबईबाहेरही हे कार्यक्रम पोहोचवायला पाहिजेत.

**-विनायक कडू**